**सातारा जिल्हा परिषद,सातारा,ग्रामपंचायत विभाग.**
दूरध्वनी क्रमांक ०२१६२-२३३८४३ ईमेल vptzpsatara2@yahoo.in

**अत्यंत महत्वाचे**

क्र.ग्रापं/५/कावि/ ६५९३ /२०१६, दिनांक ४ /७/२०१६

प्रति,

१) **उपविभागीय अधिकारी,**
उपविभाग.......... (सर्व), जि.सातारा.

२) **तहसिलदार,**
तहसिल ...................(सर्व), जि.सातारा.

३) **तालुका कृषि अधिकारी,**
तालुका ................ (सर्व), जि.सातारा.

विषय :- **आमचं गाव आमचा विकास - ग्रामपंचायत विकास आराखडा ग्रामस्तरावरील शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांनी प्रक्रियेमध्ये सक्रिय सहभाग घेणेबाबत..**

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जीपीडीपी-२०१५/ प्र.क्र.३८/पं.रा.-६ दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५.

उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णयान्वये, १४ व्या वित्त आयोगाच्या निर्देशानुसार '**आमचं गाव आमचा विकास**' या उपक्रमांतर्गत जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणेचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार या उपक्रमांतर्गत विविध लक्ष घटकांचे क्षमता बांधणी व प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करण्यात आले आहेत.

ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करताना गावपातळीवरील सर्व शासकीय, निमशासकीय व अन्य कर्मचाऱ्यांचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. त्यांचे सक्रिय सहभागाशिवाय ग्रामपंचायत विकास आराखडा परिपूर्ण होऊ शकणार नाही. ग्रामपंचायत स्तरावरील कर्मचाऱ्यांच्या एक दिवसाच्या कार्यशाळा त्या-त्या गणामध्ये संपन्न झाल्या असून कर्मचाऱ्यांना त्यांची जबाबदारी सांगण्यात आली आहे.

सद्यस्थितीत, प्रत्यक्ष साडेतीन दिवसीय गावस्तरावरील लोकसहभागीय नियोजन प्रक्रिया ग्रामपंचायत स्तरावर सुरु करण्यात आली असून या प्रक्रियेमध्ये ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करुन त्यास दिनांक १५ ऑगस्ट,२०१६ पूर्वी ग्रामसभेमध्ये अंतीम मान्यता घ्यावयाची आहे. या प्रक्रियेपूर्वी ग्रामपंचायत पुस्तिका व महसुली गाव पुस्तिका भरुन ग्रामपंचायत एकात्मिक माहितीकोष तयार करावयाचा आहे. महसुली गाव पुस्तिका भरण्यामध्ये तलाठी व कृषि सहाय्यक यांची अत्यंत महत्वाची जबाबदारी आहे. महसुली गाव पुस्तीकेमध्ये तलाठी व कृषि सहाय्यक यांनी भरावयाची माहिती अपूर्ण व चुकीची भरण्यात आल्यास ग्रामपंचायत विकास आराखडा परिपूर्ण होणार नाही. तसेच गावपातळीवरील कर्मचाऱ्यांनी साडेतीन दिवसाच्या नियोजन प्रक्रियेमध्ये पूर्णवेळ उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

त्यानुसार, आपण आपले अधिनस्त तलाठी व कृषि सहाय्यक यांनी ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्याच्या साडेतीन दिवसाच्या प्रक्रियेमध्ये पूर्णवेळ उपस्थित राहणेबाबत तसेच ग्रामपंचायत एकात्मिक माहितीकोष भरणेसाठी ग्रामपंचायतीला मदत करणेच्या सूचना आपलेस्तरावरुन निर्गमित करावयात. सदर प्रक्रियेमध्ये तलाठी व कृषि सहाय्यक उपस्थित राहिले नाहीत तर याबाबत आपणास जबाबदार धरण्यात येईल,याची नोंद घ्यावी. तसेच आपण स्वत: वेळोवेळी ग्रामपंचायतींना भेटी देऊन ग्रामपंचायतींना गुणवत्तापूर्वक विकास आराखडा तयार करणेसाठी मार्गदर्शन करावे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद,सातारा.**

**जिल्हाधिकारी,**
**सातारा.**

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती ............(सर्व), जि.सातारा